मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा उड्डाणपूल आणि कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा उड्डाणपूल या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास व सदर प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७ (ई-१७७०३८६)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०२६.

प्रस्तावना :-

मुंबई महानगर प्रदेशातील लोकसंख्या वाढ, विकास आणि रोजगार वाढ लक्षात घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सन २००८ मध्ये सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास (CTS) करण्यात आला. त्यानुसार कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि पनवेल या शहरांना जोडणाऱ्या मुंबई मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) चा विस्तार मुंबई मेट्रो मार्गिका-१२ (कल्याण ते तळोजा - एकूण लांबी २३.५७ किमी, अंदाजे खर्च रु. ५,८६५ कोटी) द्वारे करण्यास दि. ०६/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान मानपाडा ते पिसार्वे या १३.०७ किमी लांबीच्या पट्ट्यात काही तांत्रिक अडचणी समोर आल्या. तांत्रिक अडचणींचा विचार करून प्राधिकरणाने सामान्य सल्लागारांमार्फत मेट्रो मार्ग-१२ च्या विस्ताराचे म्हणजेच मुंबई मेट्रो मार्गिका-१२ अ (मानपाडा - कल्याण-शिळ मार्गे - कटाई नाका - कल्याण फाटा - जुना मुंबई-पुणे महामार्ग - तळोजा) या नवीन संरेखनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला. यात मुंबई मेट्रो मार्ग-१४ (कांजूरमार्ग ते बदलापूर) सह कटई नाका ते कल्याण फाटा दरम्यान एकात्मिकीकरण, डेपो जोडणी आणि ठाणे हाय स्पीड रेल्वे स्थानकासाठीच्या जोडणीचा समावेश करण्यात आला आहे.

तसेच, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (MSRDC) भिवंडी (रांजनोली जंक्शन) ते कल्याण-शिळफाटा (२१ किमी) हा रस्ता व प्रस्तावित ४-पदरी उन्नत रस्ता प्रकल्प प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आला. यावर प्राधिकरणाने समवयस्क पुनरावलोकन (Peer Review) करून भिवंडी (रांजनोली जंक्शन) ते कल्याण-शिळफाटा ४-पदरी उड्डाणपूल (लांबी १९.४० किमी, रुंदी २१ मीटर) व द्विस्तरीय (Double Decker) प्रकल्पाचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, प्राधिकरणाने भिवंडी (रांजनोली जंक्शन) ते कल्याण-शिळफाटा दरम्यान उभारण्यात येणाऱ्या द्विस्तरीय उड्डाणपूल व मेट्रो मार्गिका प्रकल्पापैकी कल्याण फाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा स्थानका दरम्यान उभारावयाच्या २+२ पदरी उड्डाणपूलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला आहे. तसेच, प्राधिकरणाने कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा दरम्यान (३+३

मार्गिका) उड्डाणपूलासह मुंबई मेट्रो मार्गिका-१२ अ प्रकल्पाची एकात्मिक द्विस्तरीय संरचना प्रस्तावित केली आहे. त्या अनुषंगाने मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) (एकूण लांबी १८.४ किमी डेपोच्या जोडणीसह) (१२ उन्नत स्थानके) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) (६.९२ किमी) उड्डाणपूल आणि कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) (८.६९ किमी) उड्डाणपूल या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना प्रकल्पास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहेः-

०२. शासन निर्णय :-

मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) उड्डाणपूल आणि कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) उड्डाणपूल या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पाचे महत्व विचार घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सादर केलेल्या प्रस्तावास पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या एकूण लांबी १८.४ किमी (डेपोच्या जोडणीसह) व १२ उन्नत स्थानके असलेल्या एकूण रु. ९३६६.५३ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) ६.९२ किमी लांबीचा रु. २५१६.९० कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीचा उड्डाणपूल आणि कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) ८.६९ किमी लांबीचा रु. १९७२.९४ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीचा उड्डाणपूल या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या एकूण रु. १३८५६.३७ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) उड्डाणपूल आणि कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) उड्डाणपूल या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पासाठी सोबतच्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या वित्तीय सहभागाद्वारे निधी उभारुन अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्पासाठी एकूण करांकरीता आणि जमिन आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत करीता राज्य शासनाकडून रू. २०६२.२२ कोटी इतके बिनव्याजी दुय्यम कर्ज (subordinate debt) प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) सदर प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या कर्जाच्या बांधकाम कालावधी दरम्यानच्या व्याजाची रक्कम रु. १२७१ कोटी ही प्राधिकरणाने सोसावी.

५) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेल्या कल्याणफाटा-शिळ जंक्शन-कल्याण- राजनोली (भिवंडी) जंक्शन दरम्यान उन्नत रस्ता (२+२ मार्गिका) बांधकाम

प्रकल्पाच्या अंदाजित रक्कम रु. ५९०९.२१ कोटी इतक्या रकमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालातील मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) या ६.९२ किमी लांबीचा उन्नत रस्ते मार्ग हा मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ सोबत विचारात घेण्यात आलेला आहे. तथापि, राज्य शासनावर असलेले दायित्व विचारात घेता, उर्वरीत लांबीतील मानपाडा-कल्याण-राजनोली जंक्शन (भिवंडी) या १२.४८ किमी उन्नत रस्ते मार्गाचा खर्च प्राधिकरणाने स्वनिधीतून किंवा कर्जाच्या माध्यमातून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, मानपाडा-कल्याण-रांजनोली जंक्शन या लांबीतील उन्नत रस्ते मार्ग उभारणीसाठी आवश्यक त्या अनुषांगिक मान्यता (टोल आकारणी, प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादन इ.) देण्यात येत आहेत.

६) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पासाठी आवश्यक असल्यास अशी शासकीय/निमशासकीय जमीन नाममात्र दराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास (एमएमआरडीए) प्रदान करावी, यासाठी संबंधित विभागांना/शासकीय संस्था/निमशासकीय संस्थांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले खाजगी भूसंपादन व पुनर्वसन आणि पुनर्वसाहत हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावे व त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आवश्यक ते सर्व सहकार्य करावे.

८) सदर प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सदर दुय्यम कर्जाची परतफेड वितरीत केल्याच्या प्रमाणात एका हप्त्यात करावी.

९) सदर प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या अटी व शर्ती, मूळ रक्कमेची परतफेड आणि इतर संबंधित बाबींबाबत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव/सचिव, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव (नवि-१) आणि महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात पूरक वित्तीय करारनामा (Subsidiary Loan Agreement - SLA) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) रु. १०५२२.७८ कोटी रकमेच्या मर्यादेत देशांतर्गत/द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्था/अन्य वित्तीय संस्थामार्फत सुलभ व्याज दराचे कर्ज Back to Back Basis किंवा इतर उचित मार्गाने (Pass Through Assistance-PTA) संबंधित

प्रकल्प अंमलबजावणी संस्थांद्वारे घेण्यास राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर रकमेतील काही प्रमाणातील रक्कम प्राधिकरणाने स्वनिधीतून खर्च करण्याबाबत प्रयत्न करावेत. सदर कर्ज घेण्याच्या अनुषंगाने वित्तीय संस्था निवडणे तसेच इतर पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

११) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची प्राथमिक जबाबदारी ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची राहील.

१२) सदर नमूद प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीचे दायित्व/आकस्मिक जबाबदारी राज्य शासनाद्वारे स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज सहाय्यासाठी आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडून हमी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात बाह्य कर्ज सहाय्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्था आणि केंद्र शासन यांच्यात कर्ज करारनामा करण्यास तसेच संबंधित वित्तीय संस्था, राज्य शासन (नगर विकास विभाग), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात प्रकल्प करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य सहाय्यित कर्ज उचलण्यासाठी मुदतवाढ देण्याची आवश्यकता भासल्यास त्यास वित्त विभागाच्या स्तरावरुन मान्यता देण्यास व केंद्रशासनास तशी विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५) सदर प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त देशांतर्गत/द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची वेळोवेळी परतफ़ेड होईल तसेच याचा भार राज्यशासनावर येणार नाही याची दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

१६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला सोबत जोडलेल्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद वित्तीय आराखड्यानुसार राज्यशासनाने सोसावयाच्या निधीपेक्षा अधिकचा निधी सदर प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात येणार नाही, याची नोंद मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घ्यावी.

१७) सोबतच्या परिशिष्ट-५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेदरांस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, उल्लेखीत भाडेदरांत मेट्रो रेल प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, शासनाच्या पूर्व मान्यतेने, आवश्यक ते बदल करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला निर्देश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मेट्रो कायद्यानुसार भाडेदरात पुढील बदल करण्याचे अधिकार भाडे निर्धारण समितीला (Fare Fixation Committee) आहेत, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

१८) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १७ (४) अन्वये प्राधिकरणास प्रकल्प कार्यान्वयन व देखभालीच्या खर्चाकरीता पथकर वसुलीचे अधिकार आहेत. सबब, रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या संपूर्ण उन्नत रस्ते मार्ग प्रकल्पास Dedicated Access Control तत्वावर पथकर लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१९) सदर मेट्रो प्रकल्प "मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, २००९" च्या तरतुदींच्या अनुषंगाने अंमलात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/नविन केंद्रीय भूसंपादन व पूनर्वसन व पूनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत अथवा विकास हक्क/विकास हक्क हस्तांतरण यांचे माध्यमातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२१) भूसंपादन प्रक्रियेमुळे प्रकल्प अंमलबजावणीस विलंब होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता प्राधिकरणाने घ्यावी.

२२) सदर मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) प्रकल्पाला विविध प्रयोजनार्थ (उदाहरणार्थ, महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या कलम १२४B, महाराष्ट्र नगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १४९ तसेच इतर संबंधित कायदे/नियम) “महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प” आणि “महत्त्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प” म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२३) तसेच, रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या संपूर्ण मेट्रो मार्गासह उड्डाणपूल प्रकल्पास उपरोक्त प्रयोजनार्थ “महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प” आणि “महत्त्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प” म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पाच्या मार्गिकेच्या संरेखनामध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये अथवा प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२५) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरसडीए) करावी.

२६) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पासाठी/प्रकल्पाच्या संरेखनासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्ती करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

२७) सदरहु मेट्रो प्रकल्प तसेच, प्राधिकरणामार्फ़त हाती घेतलेले मेट्रो प्रकल्प यांच्या आर्थिक व्यवहार्यतेसाठी कल्याण, अंबरनाथ, ठाणे व पनवेल येथील एकूण ७२७.१८ हेक्टर शासकीय जमीन (डीपीआरमध्ये दर्शविलेल्या जमिनीव्यतिरिक्त) एमएमआरडीए यांना विकसित करण्यासाठी मा. मंत्रिमंडळाने दि. ०५/०३/२०२६ रोजी संपन्न झालेल्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. एमएमआरडीए कडे हस्तांतरीत होणाऱ्या अशा जमिनींचा विकास करावा व त्यामधून टीओडी, एफएसआय व इतर अनुषंगिक माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक स्त्रोतामधून निधीची उभारणी करुन मेट्रो प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२८) सदर प्रकल्पाच्या खर्चात कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास, सदर वाढीचा संपूर्ण भार/दायित्व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) घ्यावे.

२९) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पाच्या संरेखनाची सूचना देणे आणि संबंधित शहरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULB) यांना विषयांकित प्रकल्पाच्या संरेखनाच्या अनुषंगाने स्थानिक विकास आराखड्यात (Development Plan) सुधारणा करण्याचे निर्देश देणे, जेणेकरून विषयांकित प्रकल्पाच्या संरेखनावर आधारित भूमी अधिग्रहण पूर्ण होऊ शकेल, या बाबींना मान्यता देण्यात येत आहे.

३०) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पासाठी बांधकाम कालावधीत मेट्रो मार्गाच्या आसपासच्या मोकळया जागांचा तात्पुरता वापर करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

संबंधित शासकीय आणि निमशासकीय विभागांना/कार्यालयांना निर्देश देण्यात येत आहेत. तसेच, संबंधित विभागांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला या मोकळया जागा रु.१/- (एक रुपया) च्या नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

३१) मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह रांजनोली जंक्शन (भिवंडी)-दुर्गाडी चौक-कल्याण-मानपाडा-कल्याण फ़ाटा (शिळ जंक्शन) (लांबी १९.४ किमी) व कल्याणफ़ाटा (शिळ जंक्शन) ते खुटारीगाव (तळोजा) (लांबी ८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पासाठी मार्गाच्या बाजूला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला व्यावसायिक विकसनासाठी आवश्यक असलेल्या कायमस्वरूपी जमीनीचे प्रचलित दराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्यासाठी संबंधित शासकीय/निमशासकीय विभागांना/प्राधिकरणांना आवश्यक निर्देश देण्यात येत आहेत.

३२) सदर प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यामधील विलंबामुळे वाढ होणार नाही, याची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी दक्षता घ्यावी.

३३) सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्त्रोतामधून उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३४) सदर प्रकल्पाच्या आर्थिक सुसाध्यतेकरीता उत्पन्नाचे अतिरिक्त स्त्रोत जसे की, जाहिरातीद्वारे व विविध सेवा वाहिन्यांसाठी सेवा पुरवठादारांकडून शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे आणि यातून प्राप्त होणारा निधी प्राधिकरणाच्या/राज्य शासनाच्या “नागरी परिवहन निधी” मध्ये जमा करण्यास व त्याचा विनियोग करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३५) या प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एमयुटीपी प्रकल्पासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१७००/सीआर-३१/स्लम-२, दिनांक १२.१२.२००० अन्वये लागू केलेले पुनर्वसन धोरण सदर प्रकल्पासही लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना निर्देश देण्यात येत आहेत. या प्रकल्पांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी नागरी क्षेत्रात ज्या ठिकाणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सदनिका उपलब्ध होत नसतील त्या ठिकाणी नगर विकास विभाग शा.नि. क्र चंमपा-२०१७/प्र.क्र.२३/न.वि.-२६ दिनांक १३.०६.२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिक्रमणधारकांना एकरकमी मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३६) सदरहु प्रकल्पाचे काम ३.५ वर्षात पूर्ण करण्यात यावे.

३७) राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पातील प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि.१५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांच्या समन्वयासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार (High Power Committee) समिती गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प हा उच्चाधिकार (High Power Committee) समितीच्या कार्यकक्षेत आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३८) महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या तरतुदींनुसार मुंबई मेट्रो मार्गिका-१२ अ अंतर्गत प्रकल्पांसाठी ट्रांझिट-ओरियंटेड डेव्हलपमेंट (TOD) अंमलात आणण्यासाठी तत्त्वतः मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३९) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर मेट्रो रेल प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात अवाजवी वाढ होणार नाही याची दक्षता घेऊन प्रकल्पाची उभारणी विहित मुदतीत करावी.

४०) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसात शासनास सादर करावा.

०३. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाने दिलेले अभिप्राय, दिनांक २७/१०/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०६१४३२४३८४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d258524435 27f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE073405817338 70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.06 14:33:48 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ़) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

९. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
११. व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्या. (सिडको), बेलापूर, नवी मुंबई.
१२.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर, नवी मुंबई.
१३.आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
१४.आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
१५.सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६.आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.
१७.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९.आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल.
२०.निवड नस्ती (नवि-७).

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७, दि. ०६/११/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-१

मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

अ.क्र.	तपशील			
	मार्गिका/उड्डाणपूल	मुंबई मेट्रो मार्ग-१२ अ	कल्याण फ़ाटा ते मानपाडा (२+२ मार्गिका) उड्डाणपूल	कल्याण फ़ाटा ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) उड्डाणपूल
१.	स्टँन्डर्ड गेज	१४३५ मि.मी.	-	-
२.	मेट्रो मार्गाची लांबी	१८.४ कि. मी. (१४.६ डेपो व इतर जोडणी वगळता)	६.९२४ किमी	८.६९ किमी
३.	एकूण स्थानके	१२ उन्नत	-	-
४.	प्रस्तावित कार डेपो	निळजेगाव	-	-
५.	कायमस्वरुपी आवश्यक जमीन	१.५ हे.	२.१८५ हे.	०.९५ हे
६.	तात्पुरती आवश्यक जमीन (बांधकाम कालावधी दरम्यान)	-	-	-
७.	प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी	सन २०२६-२०३१		
८.	प्रकल्पाची मूळ किंमत (जमीन किंमत + सामान्य शुल्क + आकस्मिकता खर्च इ. वगळता) (रु. कोटी)	५५९४.०६	१४३८.१४	११४६.८५
९.	जमिनीची किंमत (रु. कोटी मध्ये)	११२.५०	१४०.५४	६१.४९
१०.	आकस्मिकता खर्च (१%/३%) (जमीन व सामान्य शुल्क वगळता) (रु. कोटी)	१७६.२१	३४.०८	२७.४७
११.	सामान्य शुल्क (design charges सह) (५%) (जमीन वगळता) (रु. कोटी)	२७९.७०	३४.४१	२७.७४
१२.	मूळ किंमत (स्थापत्य काम, जमीन, पुनर्वसन व पुनर्वसाहत, प्रणाली काम, सामान्य शुल्क व	६१६२.४५	१७५७.६१	१३५४.१९

	आकस्मिक खर्चासह) (कर व दरवाढ वग़ळता) (रु. कोटी)			
१३.	एकूण कर (रु. कोटी)	११७८.५३	३१२.८४	२५२.२०
१४.	बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज(रु. कोटी)	९५२.००	१७९.००	१४०.००
१५.	दरवाढ (रु. कोटी)	१०७३.५५	२६७.४५	२२६.५४
१६.	प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (IDC सह) (रु. कोटी)	**९३६६.५३**	**२५१६.९०**	**१९७२.९४**
१७.	आर्थिक अंतर्गत परतावा दर (EIRR)	**१४.२५ %**		
१८.	वित्तीय अंतर्गत परतावा दर (FIRR)	**मेट्रो प्रकल्पाचा ४.४५ % , मेट्रो प्रकल्प व उड्डाणपूलासह ९.१६%**		
१९.	प्रवासी क्षमता (६ डब्यांची गाडी)	६ प्रवासी प्रति चौरस मिटर-१७५६		
२०.	प्रतिताशी प्रतीदिशा प्रवासी संख्या (PHPDT)	वर्ष २०३१ - २५,१८९ वर्ष २०४१ - २५,५८०	-	-
२१.	दैनंदिन प्रवासी संख्या (लक्ष) /सरासरी दैनंदिन रहदारी	वर्ष २०३१ - ४.७४ वर्ष २०४१ - ५.०६	१,६०,६२४ एकूण वाहने १,३४,८५९ प्रवासी वाहने	

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8bad bee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574B86F1A1EDB58BF8742411 8BCCD6EE073405817338 70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.06 14:34:10 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७, दि.०६/११/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-२

अ) मुंबई मेट्रो मार्ग १२ अ - (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) प्रकल्प खर्चाचा सारांश

अ.क्र.	तपशील	रक्कम रु. कोटीमध्ये
१.	अभियांत्रिकी किंमत (ऑक्टोबर २०२५ च्या किंमतीवर आधारीत)	५५९४.०३
२.	जमीनी संबंधित किंमत (जमीन अधिग्रहण) + पुनर्वसन व पुनर्वसाहत	११२.५०
३.	आराखड्याच्या खर्चासह सामान्य किंमत	२७९.७०
४.	आकस्मिक किंमत @ ३%	१७६.२१
५.	एकूण कर	११७८.५३
६.	**एकूण सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) किंमत.**	**७३४०.९८**
७.	दरवाढ	१०७३.५५
८.	बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) /वित्तीय शुल्क	९५२.००
९.	**एकूण प्रकल्प पूर्णत्वाची किंमत**	**९३६६.५३**

ब) कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) उड्डाणपूल प्रकल्प खर्चाचा सारांश :

अ.क्र.	तपशील	रक्कम रु. कोटीमध्ये
१.	अभियांत्रिकी किंमत	१४३६.१४
२.	जमीनी संबंधित किंमत (जमीन अधिग्रहण)	१४०.५४
३.	आराखड्याच्या खर्चासह सामान्य किंमत/सल्लागार शुल्क	१४६.८५
४.	आकस्मिक किंमत @ १% + तात्पुरती तरतूद @ १%	३४.०८
५.	एकूण कर	३१२.८४
६.	**एकूण सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) किंमत.**	**२०७०.४५**
७.	बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) /वित्तीय शुल्क	१७९.००
८.	दरवाढ	२६७.४५
९.	**एकूण प्रकल्प पूर्णत्वाची किंमत**	**२५१६.९०**

क) कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) उड्डाणपूल प्रकल्प खर्चाचा सारांश

अ.क्र.	तपशील	रक्कम रु. कोटीमध्ये
१.	अभियांत्रिकी किंमत	११४६.८५
२.	जमीनी संबंधित किंमत (जमीन अधिग्रहण)	६१.४९
३.	आराखड्याच्या खर्चासह सामान्य किंमत/सल्लागार शुल्क	११८.३९
४.	आकस्मिक किंमत @ १% + तात्पुरती तरतूद @ १%	२७.४७
५.	एकूण कर	२५२.२०
६.	**एकूण सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) किंमत.**	**१६०६.४०**
७.	बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) /वित्तीय शुल्क	१४०.००
८.	दरवाढ	२२६.५४
९.	**एकूण प्रकल्प पूर्णत्वाची किंमत**	**१९७२.९४**

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७, दि.०६/११/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

मुंबई मेट्रो मार्ग १२ अ - (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) (एकूण लांबी १८.४ किमी डेपोच्या जोडणीसह) (१२ उन्नत स्थानके) या विस्तारीत मेट्रो मार्गिकेसह कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) (६.९२ किमी) उड्डाणपूल आणि कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) उड्डाणपूल (८.६९ किमी) या मेट्रो मार्गिका व उड्डाणपूल अशा एकात्मिक संरचना असलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत :

अ. क्र.	प्रकल्पाचा घटक	रक्कम (रु. कोटी)
१.	मुंबई मेट्रो मार्ग १२ अ - (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा)	९३६६.५३
२.	कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते मानपाडा (२+२ मार्गिका) (६.९२ किमी) उड्डाणपूल	२५१६.९०
३.	कल्याण फ़ाटा (शिळफ़ाटा) ते खुटारीगाव, तळोजा (३+३ मार्गिका) उड्डाणपूल	१९७२.९४
	एकूण	**१३८५६.३७**

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d2585244352 7f4a3927a849feec29ce2636 8b8badbee9e698528450a, postalCode=-400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.06 14:34:23 +0530'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७, दि. ०६/११/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-३

मुंबई मेट्रो मार्ग १२ अ - (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या प्रकल्पाचा वित्तीय सहभाग आराखडा

अ.क्र	आर्थिक सहभागी संस्था	तपशील (प्रकल्प पूर्णत्वाच्या किंमतीवर)	प्रकल्प किंमत (रु.कोटी)
१	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग	अंतर्देशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज सहाय्य किंवा प्राधिकरणाच्या स्वनिधीतून (स्थापत्य कामाचा खर्च)	१०५२२.७८
		देशांतर्गत/द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/अंतर्देशीय विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज सहाय्य (प्रणालीचा खर्च)	
		बांधकाम कालावधीमधील व्याजाकरीता रु. १२७१ कोटी	१२७१.००
२	राज्य शासनाचा सहभाग (दुय्यम बिनव्याजी कर्ज सहाय्य स्वरुपात)	अ) एकूण कराच्या रकमेकरीता- रु. १७४३.५७ कोटी आ) जमिनीची किंमत-रु. ३१४.५३ कोटी इ) पुनर्वसन व पुनर्वसाहत (R&R)- रु. ४.१२ कोटी	२०६२.२२
	एकूण पूर्णत्वाची किंमत		**१३,८५६.००**

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d24278d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB588BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.06 14:34:35 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७, दि. ०६/११/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-४

प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत :-

a. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडे/ राज्य शासनाच्या नागरी परिवहन निधिमध्ये वर्ग करणे.

b. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिका/नियोजन प्राधिकरण क्षेत्रात वसूल होणाऱ्या रक्कमेमधून सदर वाढीव विकास शुल्काची रक्कम राज्य स्तरावरील नागरी परिवहन निधीमध्ये वर्ग करणे.

c. महत्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच १ टक्के अधिभार लावण्याची तरतूद सन २०१५ चा अधिनिमय क्र.३५ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४९ ब मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर प्रयोजनातून प्राप्त रक्कम विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापरणे.

d. मेट्रो कार डेपोच्या जागा तसेच प्रकल्प अंमलबजावणी संस्थेला हस्तांतरीत जमिनींच्या वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

e. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या आगमन/निर्गमन ठिकाणी, स्थानकांच्या नावांचे ब्रँडींग, डेपो, स्थानकांवरील जाहिरात तसेच ट्रेन कोचेस रॅपिंग च्या माध्यमातून जाहिरात व पार्कींगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

f. मेट्रो स्थानकांवर स्थित किऑस्क, एटीएम सेंटर्स इ. माध्यमातून मिळणारे उत्पन्न.

g. सदर विविध स्त्रोतांतून प्राप्त होणारा निधी हा एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" जमा करावयाचा असून तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस वापरण्यास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रचालनादरम्यान मालमत्ता व्यवसाय आणि जाहिराती यांद्वारे तिकीट भाड्यामधून प्राप्त महसुलाच्या १०% इतके उत्पन्न अंदाजित केले गेले आहे. मेट्रो स्थानकांवरील आणि कार डेपोवरील मालमत्तेचा विकास करणे, स्थानकांवरील पार्किंग हक्कांचे लीजिंग, कोचेस आणि तिकिटांवर जाहिराती, स्थानकांमध्ये आणि पार्किंग लॉट्समध्ये जाहिराती, व्हायडक्ट्स, कॉलम्स आणि इतर मेट्रो संरचनांवर जाहिराती, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी को-ब्रँडिंग आणि नामकरण हक्क, मेट्रो परिसरामधील चित्रपटांचे चित्रीकरण आणि विविध विशेष कार्यक्रमांच्या (Events) आयोजनाद्वारे संसाधने उभारण्यात येतील.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d24787d2585244352f4a3927a849feec29ce26368b8badbee9e698528 45f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BBF8742411 8BCCD6EE0734058173 3B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.06 14:34:48 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.९५/नवि-७, दि. ०६/११/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-५

मुंबई मेट्रो मार्ग १२ अ - (मानपाडा-कल्याण फ़ाटा-खुटारी गाव,तळोजा) या प्रकल्पाची तिकीट भाडे संरचना :

वाहन सर्वेक्षण आणि प्रवासी संख्या अंदाजासाठी विचारात घेतलेल्या सन २०२४-२५ साठीच्या भाडे संरचनेचा वापर प्रकल्पाच्या FIRR (Financial Internal Rate of Return) च्या गणनेसाठी मूलभूत भाडे म्हणून केला गेला आहे. FIRR गणनेसाठी विद्यमान भाडे संरचनेवर दोन वर्षांनी १० % चा वाढीचा घटक लागू करण्यात आला आहे, जो किंमतीच्या निर्देशांकातील सरासरी कल (Trend) आणि परिचालन खर्चाच्या माहितीवर (Input) आधारित आहे.

अंतर (कि.मी.)	०-३	३-६	६-९	९-१२	१२-१८	१८-२५
भाडे (रु.)	१०	२०	३०	४०	५०	६०

वरील भाडे दरांच्या आधारे, प्रस्तावित आहे की मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रारंभापूर्वी, प्रकल्पाच्या आर्थिक कार्यक्षमतेची तपासणी करण्यात यावे आणि आवश्यक असल्यास, शासनाची पूर्व परवानगी घेऊन आवश्यक ते बदल केले जावेत. मेट्रो कायद्यानुसार, भविष्यकालीन भाडे दरात बदल करण्याचे अधिकार भाडे निश्चिती समितीकडे आहेत.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d258524435 27f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE0734058173 3B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.11.06 14:35:00 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन